


■ आयसीडब्ल्यूएआयच्या परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगीचे छायाचित्र.

# यशासाठी इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाची गरज -चाफेकर

*लोकमत ब्युरो/७ सप्टेंबर*

■ **औरंगाबाद :** मोठे यश मिळविण्यासाठी इच्छाशक्ती, आत्मविश्वास आणि प्रयत्नांमध्ये सातत्य असणे आवश्यक असते, असे मत एन्ड्युरन्स कंपनी समूहाचे सरव्यवस्थापक एम.एम. चाफेकर यांनी व्यक्त केले.

जून-२००६ मध्ये झालेल्या आयसीडब्ल्यूएआयच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रारंभी, आयसीडब्ल्यूएआयच्या औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष आर.पी. गोरे यांनी चॅप्टरच्या उपक्रमांची माहिती दिली. उपाध्यक्ष आर.बी. शुक्ला यांनी अतिथींची ओळख करून दिली. उपाध्यक्ष एस.के. जैन आणि प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए.आर. जोशी यांनीही आपले विचार व्यक्त केले.

आयसीडब्ल्यूएआयच्या औरंगाबाद शाखेचे विद्यार्थी राहिलेले भरत असावा यांनी आपले दिवंगत आजोबा शिवनाथ असावा यांच्या स्मृत्यर्थ आयसीडब्ल्यूएआयच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास 'स्व. शिवनाथ असावा' पुरस्कार देण्याची घोषणा केली. पहिला पुरस्कार शिशिर भालचंद्र यास मिळाला.